२०२३
सकाळ TODAY
SakalNews @SakalMediaNews www.esakal.com
· Registered · Date of Publication : मंगळवार, ७ नोव्हेंबर २०२३ · Posted at BPC Vishrambagwada, CSO Pune Daily · आर.एन.आय. एम.ए.एच.एम.ए.आर/२००३/१०६७०, रजि. नं. पी.सी.डब्ल्यू./०६९/२०२१-२०२३

## शिवाजी विद्यापीठ विभागीय मैदानी स्पर्धेत यश : ४३ पदकांसह सलग नवव्या वर्षी अव्वल

# डी. पी. भोसले कॉलेजला चॅम्पियनशिप

**कोरेगाव, ता. ६ :** शिवाजी विद्यापीठ सातारा विभागीय मैदानी स्पर्धेत येथील डी. पी. भोसले महाविद्यालयाच्या संघाने विविध क्रीडा प्रकारांत ४३ पदके पटकावत सलग नवव्या वर्षी चॅम्पियनशिप मिळवली आहे.

सातारा क्रीडा संकुलात दोन ते चार नोव्हेंबरअखेर झालेल्या या स्पर्धेमध्ये जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांच्या संघाने सहभाग घेतला होता. त्यामध्ये 'डी. पी.'च्या पुरुष व महिला या दोन्हीही संघांनी विजेतेपद मिळवले. तसेच सर्वोत्कृष्ट पुरुष खेळाडू किताब 'डी. पी.'च्याच ऋषिकेश बगाडेने २०० व ४०० मीटर धावण्यात सुवर्ण, तसेच ४×४०० मीटर व ४×१०० मीटर मिक्स रिलेत सुवर्णपदक प्राप्त करत मिळवला. महाविद्यालयाच्या संघाने वेगवेगळ्या क्रीडा प्रकारांमध्ये एकूण ३० सुवर्ण, नऊ कास्य व चार रौप्य पदक अशी एकूण ४३ पदक मिळवून चॅम्पियनशिप मिळवली. पारितोषिक वितरण समारंभ सातारा जिल्हा क्रीडा अधिकारी नितीन तारळकर, प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव, डॉ. संजय कांबळे आदींच्या हस्ते झाला. त्यांनी संघाचे कौतुक केले.



**सातारा : विभागीय स्पर्धेतील चॅम्पियनशिप ट्रॉफी नितीन तारळकर, प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव, डॉ. संजय कांबळे आदींच्या हस्ते स्वीकारताना 'डी. पी.'चे खेळाडू व कॅप्टन बाळकृष्ण भोसले.**

'डी. पी.'च्या संघात ऋषिकेश बगाडे, आरती बर्गे, सुश्मिता घाडगे, आरती बाबर, शिवानी शेळके, गौरी खिलारे, किरण माने, अभिषेक मते, विकी चौरसिया, काजल खान, दिव्या महानोर, पूजा पांढरे, सागर जाधव, साहिल भोसले, प्रतीक गोळे, रोहन माने, तुषार ढेंबरे, ऋषिकेश घाडगे, अनिकेत पवार, अथर्व जाधव, प्रणाली गोगावले, क्रांती शिंदे आदी खेळाडूंनी प्रावीण्य मिळवून शिवाजी विद्यापीठाच्या इंटर झोनल स्पर्धेमध्ये सहभाग मिळवला आहे. सर्व खेळाडूंना आंतरराष्ट्रीय खेळाडू शुभम देशमुख, रेश्मा केवटे, राणी मुचंडी, आदेश देशमुख यांनी मार्गदर्शन केले.

रयत शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष चंद्रकांत दळवी, सचिव विकास देशमुख, सहसचिव डॉ. ज्ञानदेव मस्के, ऑडिटर डॉ. शिवलिंग मेनकुदळे, महाविद्यालयाचे माजी प्राचार्य एस. के. पाटील, डॉ. विजयसिंह सावंत, प्रभारी प्राचार्य डॉ. बाळासाहेब चव्हाण, एक्स डिफेन्सचे पदाधिकारी, आजी - माजी खेळाडू, शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी यशस्वी खेळाडू व क्रीडा विभागप्रमुख कॅप्टन बाळासाहेब भोसले, ज्युनिअर विभागप्रमुख सनी मोरे, आदेश देशमुख, किशोर अनभुले यांचे अभिनंदन केले.